**<u>नियमीत फौजदारी खटला क्रं.४५८/२०१९ मधील नि.क्र.४२ वरील आदेश</u>**

**<u>CNR NO-MHSN06-003309-2019</u>**

<u>*(*महाराष्ट्र सरकार वि. राजू म्हेतर आणि इतर *)*</u>

दोन्ही पक्षांच्या हुशार विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला, अभिलेखाची पहाणी केली. आरोपी क्र. ०३ ते ०५ व ७ ते १२ यांनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २३९ अन्वये दोषमुक्त करण्याकरिता सदरचा अर्ज दाखल केला आहे. अभिलेखाची पहाणी केली असता असे दिसून येत आहे की, आरोपी क्र. ०१ ते १२ यांची अवैद्यरितीने निर्गमीत झालेल्या खोटया नियुक्ती आदेशान्वये महानगर पालिकेत रुजु झाले. सफाई कामगार म्हणून भरती केली. सदर झेरॉक्स नियुक्ती आदेशावर आरोपींची नावे आहेत. त्या झेरॉक्स प्रतीवर, स्वाक्षरीवर बोगस स्वाक्षरी गिरवून त्यास कार्यालयाचा जावक क्रमांक, दिनांक इत्यादी नमुद करुन, सदर नियुक्ती आदेशामध्ये बदल करुन सफाई कामगार यांचे नियुक्तीचे बोगस, बनावट आदेश तयार करुन आरोपी हे आरोग्य विभाग, मिरज येथे सफाई कामगार म्हणून हजर झाले. दि.०१.११.२०१३ ते दि. २८.०२.२०१४ अखेरपर्यंत महानगरपालिके कडून र.रु.१,२६,०००/- इतके पगाराच्या स्वरुपात मानधन घेऊन सदर बनावट आदेशाद्वारे महानगरपालिकेची फसवणुक केली आहे असा गुन्हा दाखल केला आहे. आरोपी क्र. १३ हे परागंधा आहे. आरोपी क्र. ०१ ते १२ हे सफाई कामगार यांची नावे वरील जबाबामध्ये नमुद आहे. सदर प्रकरणामध्ये आरोपी क्र.०१ ते १२ यांच्या नावातील बोगस, बनावट नियुक्ती अन्वये नेमणुक झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. परंतु सदर आरोपींनी त्यांच्या नियुक्तीचे मुळ आदेश अभिलेखावर सदर अर्जासोबत दाखल केले नाही. त्यामुळे सदर आरोपी यांचे सदर प्रकरणामध्ये सहभाग नाही हे पुरावे न नोंदविता निष्कर्शीत करणे न्यायोचीत वाटत नाही. सदरचे प्रकरण हे दोषारोप करण्याकरिता प्रलंबीत आहे. ही सर्व वस्तुस्थिती लक्षात घेता सदर अर्ज सद्य स्थितीस नामंजूर करणेस पात्र आहे. म्हणून खालील आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

सदरचा अर्ज नामंजूर करणेत येतो.

सही/-

मिरज **(श्रीमती एम.एस.मनगुळी)**

दि.२०.०१.२०२४ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मिरज.

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file order/judgment are same word to word, as per the original order/judgment -

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Smt. S.P. Patil, (Grade-III) |
| Court | : | 3rd Jt. Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Miraj |
| Date | : | 20/01/2024 |
| Order signed by the Presiding Officer | : | 20/01/2024 |
| Order uploaded on | : | 20/01/2024 |